# समान शिक्षण अभियान

## Equal Education Campaign

## समान चांगले  गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि समान संधी मिळविण्याचा संकल्प



आज आपल्या मुलांना अभूतपूर्व असमानतेच्या स्थितीचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण, गरीब, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समुदायातून येणाऱ्या मुलांवर शिक्षणाच्या क्षेत्रात अन्याय होत आहे. त्यांना त्यांच्या सर्वोच्च मानवी क्षमतेपर्यंत वाढण्याची योग्य संधी नाकारली जात आहे. त्यांना बहुतेक मूलभूत सुविधा सुद्धा मिळत नाही आहेत. आणि दर्जाहीन शिक्षण घेण्यास त्यांना भाग पाडले जात आहे. दुसरीकडे, काही मुले खाजगी शाळांमध्ये सर्वोच्च सुविधा आणि उच्च गुणवत्तेचे शिक्षण घेत आहेत. शिक्षणाच्या गुणवत्तेत हा मोठा फरक दोन वेगळे भारत बनवित आहेत; एक लहान भारत जो शिक्षणाच्या प्रकाशात चमकतो आणि दुसरा एक मोठा भारत जो दर्जाहीन शिक्षणाच्या अंधारात कोलमडला आहे.




जर आपण एखाद्या गरीब कुटुंबात जन्माला आला असाल, जर आपण एक मुलगी म्हणून जन्माला आले असाल,
जर आपला जन्म ग्रामीण भागात झाला असेल किंवा आपण अशा पालकांच्या घरात जन्मला असाल जे अशिक्षित आहेत
किंवा जर आपण सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेल्या समुदायात जन्मला असाल तर आपल्याला या अन्याय आणि संधीच्या विषमतेचा सामना करावा लागेल. आजच्या सुसंस्कृत जगात आपण ज्या कुटुंबात जन्माला आलो किंवा कुठल्या ठिकाणी आपला जन्म झाला ह्याने आपले भविष्य का ठरावे? हा समाज आणि राष्ट्र कमीत कमी ह्या राष्ट्रातील सर्व मुला-मुलींना समान आणि चांगले दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करू शकले पाहिजेत. प्रत्येक मुलीला/मुलाला त्यांच्या संपूर्ण मानवी क्षमतेपर्यंत पोहोचण्याची समान संधी मिळवून देवूनच आपण एक समृद्ध आणि महान नागरिक राष्ट्र बनण्याची कल्पना करू शकतो.

सरकारला दोष देवून कोणताही फायदा होणार नाही! राजकारण्यांना कोसून कोणताही फायदा नाही. भूतकाळावर टीका करत राहिल्याने कुठलाही फायदा होणार नाही. परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करणे हीच एकमेव फायदेशीर गोष्ट आहे. आणि समान शिक्षण मोहीमे द्वारे या देशातील नागरिक म्हणून आमचा तोच प्रयत्न आहे आणि हे सुनिश्चित करण्यासाठी आपल्याला शाळा, समाज आणि सरकार सोबत जुळून काम करावे लागेल.
शिक्षणाचा कायदा, सर्व शिक्षा, माध्यमिक शिक्षा आणि आता समग्र शिक्षा अभियान इत्यादी सर्व शाळांमध्ये सर्व मूलभूत सुविधा आणि चांगल्या प्रतीचे शिक्षण देण्याचे आश्वासन देतात. हा आपल्या मुलांचा हक्क आहे आणि आपल्याला तो मिळवून द्यावा लागेल.

## चला, आपल्या शेजारच्या शाळेत पुढील गोष्टी आहेत याची खात्री करुन घेऊ या.

- सर्व मुलं शाळेत जातात
- वर्गात पूरेसे दिवे व पंखे आहेत.
- बसण्यासाठी डेस्क-बेंच किंवा चांगल्या मॅट आहेत आणि शिकवण्यासाठी चांगले बोर्ड आहेत.
- मुलींसाठी आणि मुलांसाठी वेगवेगळे वापर करण्यायोग्य शौचालय आहेत आणि पाणी उपलब्ध आहे.
- शाळेमध्ये स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी आहे.
- शाळेमध्ये लायब्ररी आणि पुरेसी अध्यापन सामग्री आहे.
- शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी पुरेसे वर्ग आहेत.
- प्रशिक्षण आणि पुरेसे शिक्षक/शिक्षिका आहेत.
- शिक्षणाचे कार्य नियमितपणे आणि योग्य अध्यापन पद्धतीने होत आहे.
- विद्यार्थ्यांना देशात, जगात उपलब्ध संधि/ करिअरचे मार्गदर्शन, असलेले पर्याय ह्याचे शिक्षण आहे.
- खेळाचे मैदान / खेळ / मनोरंजक वस्तु / सामग्री आहेत.
- आदर्श नागरिक व मानवीय मूल्यांचे प्रभावी शिक्षण आहे.
- त्या सगळ्या वस्तु आहेत ज्या समान गुणवत्ता आणि समान संधींसाठी आवश्यक आहेत.

**(टीप: ही पूर्ण यादी नाही, फक्त काही महत्त्वाच्या गोष्टींची नोंद केलेली आहे.)**

## अभियानात आपली भूमिका काय आहे

1. शिक्षक, विद्यार्थ्यांचे पालक, शेजारच्या इतर सामाजिकदृष्ट्या जागरूक लोकांना भेटणे आणि मुलांच्या उच्च-गुणवत्तेच्या शिक्षणाच्या अधिकाराची जाणीव करुन देणे.
2. शाळेत असणाऱ्या कमतरता बघणे आणि समान उच्च-गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी शाळा विकास योजना तयार करणे.
3. समुदाय, शाळा, जिल्हा आणि राज्य स्तरावरील योजनांचे पालन आणि अंमलबजावणी सुनिश्चित करणे.
4. अंमलबजावणीची प्रगती, शाळांमधील झालेल्या कामांचे/सुधारणांचे दस्तऐवजीकरण करणे आणि भागधारकासोबत शेअर करणे. या हेतूसाठी डिझाइन केलेले सॉफ्टवेअर वापरणे.
5. मुख्य प्रवाहातील प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया ह्यांना अभियानाच्या आवश्यकतेबद्दल जागरूक करणे आणि अभियानाच्या प्रगतीबद्दल त्यांना वेळोवेळी माहिती देणे.
6. सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रत्येक मुलांसाठी उच्च-गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करण्याच्या आवश्यकतेबद्दल  सामान्य समाजाला जागरूक करणे.
7. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शांततापूर्ण बैठका, प्रेस कॉन्फरन्स, मीडिया ब्रीफिंग्ज, समान शिक्षण टीम च्या बैठका आयोजित करणे.

## अभियानाचे अपेक्षित परिणाम

1. निवडलेल्या शाळांमधील पायाभूत सुविधांमध्ये आणि इतर सुविधांमध्ये सुधारणा.
2. शिक्षण पद्धती आणि परिणामांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा.
3. मानवतावादी मूल्यांचा समावेश आणि मुलांच्या वर्तनात सदृश्य बदल.
4. अभ्यासक्रम, करिअर मार्गदर्शन, लायब्ररी इ. वर सर्वोत्तम संभाव्य सामग्रीची उपलब्धता
5. सर्व मुलांना त्यांच्या संपूर्ण मानवी क्षमतेपर्यंत विकसित करण्याची समान संधी.

